जा.क्र.सायबर/प्रेस नोट/ 3562 /2020
पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग.
दि. 10/12/2020.

# प्रेसनोट

## सिंधुदुर्ग पोलीसांच्या कडून महिला अत्याचार व बालकांवरील लैगिंक अत्याचार रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनाकरीता जनजागृती कार्यशाळेचे आयोजन

---

दिनांक 09/12/2020 रोजी न्यु इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय कसाल येथे पोलीस अधोक्षक श्री.राजेंद्र दाभाडे तसेच सावंतवाडी उपविभागीय पोलीस अधिकारी रोहीणी सोळंके व सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलातर्फे महिला अत्याचार व बालकांवरील लैगिंक अत्याचार रोखण्यासाठी न्यु इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय कसाल याठिकाणी कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. त्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.सुतार सायबर सेल, यांनी सोशल मिडीयावर होणारे अत्याचार याबाबत माहिती देऊन त्यावर काय उपाययोजना करावेत यांची माहिती विद्यार्थिनां दिली. पोलीस निरीक्षक श्रीम.संध्या गावडे प्रभारी पोलीस उपअधीक्षक मुख्या, यांनी बाल लैगिंक अत्याचार व शोषण या बाबतची माहीती विद्यार्थींनींना दिली. तसेच पोलीस उप निरीक्षक श्रीम.जगताप यांनी पोलीस दिदि बाबत माहिती दिली. सदरवेळी न्यु इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय कसाल येथील विद्यार्थींनी , जिल्हा शिक्षणाधिकारी श्री. अशोक कडुस व न्यु इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय कसाल मुख्याध्यापक कुसगावकर व संचालक मंडळ हे उपस्थित होते. तर पोलीस अधीक्षक श्री.राजेंद्र दाभाडे यांनी पुर्ण जिल्ह्यातील शाळांमध्ये महिलांवर होणाऱ्या अत्याचार रोखण्यासाठी जनजागृती करणार असलेबाबत सांगितले.

( सुनिल धनावडे )
पोलीस निरीक्षक, स्थागुअशा सिंधुदुर्ग
पोलीस अधीक्षक, कार्यालय सिंधुदुर्ग

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी,सिंधुदुर्ग

10-12-2020


64MP AI QUAD CAMERA
Shot on realme 7